# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.04.2025** **वार- गुरूवार**

---

**पुस्तक प्रकाशन**

दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं यशस्वी आयोजन केलं याचं कौतुक आहे; महाराष्ट्र आता मागे वळून पाहणार नाही, असं प्रतिपादन मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी आज पुण्यात केलं. दिल्लीत झालेल्या 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, स्वागताध्यक्ष शरद पवार आणि उद्घाटक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणावर आधारित; 'मु. पो. तालकटोरा' या पुस्तकाचं प्रकाशन भोसले यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. 99 वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरवण्याचा मान साताऱ्याला मिळावा, अशी इच्छाही भोसले यांनी यावेळी व्यक्त केली. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी दिल्लीत आंदोलन करणाऱ्या मसापच्या कार्यकर्त्यांचा या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

**थकीत एफआरपी**

राज्यातल्या 33 कारखान्यांची शेतकऱ्यांच्या ऊसाची 831 कोटी 11 लाख रूपयांची एफआरपी थकीत आहे. ही रक्कम संबंधित कारखान्यांनी 30 एप्रिलपर्यंत शेतक-यांच्या बॅंक खात्यावर जमा करावी; अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशारा साखर आयुक्त सिध्दाराम सालीमठ यांनी दिला आहे.

**महावितरण**

महावितरणच्या राज्यभरातील 25 लघु प्रशिक्षण केंद्रांतून कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिलं जातं. यामध्ये महावितरणच्या पुणे प्रादेशिक विभागाने सलग तिसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक मिळवला आहे. पुणे विभागाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी ही माहिती दिली. नाशिकच्या महावितरणच्या मुख्य प्रशिक्षण आणि सुरक्षा विभागाने जाहीर केलेल्या मानांकनात पुणे परिमंडलाच्या लघु प्रशिक्षण केंद्रानं

सलग तिसऱ्या वर्षी राज्यात प्रथम क्रमांक पटकावला असल्याचं पवार यांनी सांगितलं. गेल्या आर्थिक वर्षांत पुणे लघु प्रशिक्षण केंद्राने 286 टक्के उद्दिष्ट पूर्ण केलं.

**न्यायालय**

पुण्यातील वाकड ते बालेवाडी या पुलाचं बांधकाम होऊन 10 वर्षे झाल्यानंतरही सार्वजनिक वापरासाठी हा पूल बंदच आहे. त्यामुळे पुणे महापालिकेने जमीन अधिग्रहणाच्या प्रस्तावावर तत्काळ निर्णय घ्यावा आणि हा पूल जनतेकरता खुला करण्याची प्रक्रिया जलद करावी असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. बालेवाडी, बाणेर आणि वाकडला जोडणारा मुळा नदीवरील पूल 2013 मध्ये पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेनं संयुक्तपणे मंजूर केला होता. पूल तयारही झाला आहे. पण पुलाच्या एका बाजूचं भूसंपादन झालेलं नाही; पुणे महापालिकेने भूसंपादनासाठी 25 कोटींची तरतूद केली आहे.

**राजेंद्र भोसले**

पुणे शहरातील ज्या प्रकल्पांची कामं पूर्ण झाली आहेत, अशा प्रकल्पांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी घेतला आहे. यामध्ये नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावर बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलासह अन्य काही प्रकल्पांचा समावेश आहे. सर्व कामं व्यवस्थित पूर्ण झाली आहेत की नाही, याची तपासणी करणं आवश्यक आहे; यासाठी अचानक जाऊन पाहणी करणार असल्याचं भोसले यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

**सीसीटीव्ही**

स्वारगेट दुर्घटनेनंतर आता महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी राज्य परिवहन महामंडळानं सुमारे 14 हजार बस गाड्यांमध्ये जीपीएस, पॅनिक बटण आणि सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय आगामी शैक्षणिक वर्षापासून स्कूलबसमध्येही सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे लागणार आहेत, असं पुणे परिवहन महामंडळानं सांगितलं आहे.

**अग्निशमन**

अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी दरवर्षी 14 ते 20 एप्रिल या कालावधीत 'राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताह' राबवला जातो. या निमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं विविध उपक्रम आयोजित केले आहेत. निगडीच्या शरदनगर आणि दुर्गानगर सहकारी गृहनिर्माण संस्थेत अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना आणि मॉक ड्रीलचे आयोजन करण्यात आलं होतं.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी विभागानं 2025-26 या वर्षाची मालमत्ता कराची देयकं वितरित करण्याची जबाबदारी महिला बचत गटांवर सोपवली आहे. याबाबत बचत गटातील महिलांना आवश्यक प्रशिक्षणही महापालिकेनं दिलं आहे.

**रेल्वे**

पुणे लोणावळा रेल्वे मार्गावर मळवली दरम्यान दुरुस्तीचं काम करण्यात येणार आहे. त्यामुळे उद्यापासून 20 एप्रिलपर्यंत या मार्गावर ब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे पुणे लोणावळा दरम्यान काही लोकल गाड्या पूर्णतः तर काही अंशतः रद्द करण्यात आल्या आहेत. उद्या चेन्नई एक्स्प्रेस उशिराने धावेल अशी माहिती मध्य रेल्वेने दिली आहे.

**हास्ययोग**

पुण्यातील हास्य क्लबचे प्रणेते आणि नवचैतन्य हास्ययोग परिवाराचे संस्थापक-अध्यक्ष विठ्ठल काटे यांच्या हास्य चळवळीतील तीन दशकांच्या वाटचालीनिमित्त विदिशा विचार मंचातर्फे त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. येत्या रविवारी कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते विठ्ठल काटे यांना सन्मानित केलं जाणार असल्याचं विदिशा विचार मंचच्या संस्थापक ममता क्षेमकल्याणी यांनी कळवलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 40 अंश तर किमान तापमान 20 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**